**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

क्र.मऔविम/मावतं विभाग/ई-२२७००/२०१८

उद्योग सारथी
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : १८/१२/२०१८

**परिपत्रक**

विषय : माहिती तंत्रज्ञान उद्यानात वाटप केलेल्या भूखंडाच्या विकासासाठी सह-विकासक (Co-Developer) नेमणेबाबत.

संदर्भ : १. परिपत्रक क्र.मऔविम/सह मुकाअ(मा/तं)/विधी व कामकाज/९४/२००९ दिनांक ११/११/२००९.
२. परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/६३४७०/२०१३ दि.२७/०२/२०१३.
३. परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/बी ३९८५७/२०१५ दिनांक ११/०५/२०१५.
४. परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/बी १४८४१/२०१६ दिनांक २७/०९/२०१६.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात होत असलेली घसरण, जागतिक, औद्योगिक तसेच आर्थिक मंदी याचा विचार करता विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) मधील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (IT/ITES) क्षेत्रातील उद्योजकांना वाटप केलेल्या भूखंडाच्या विकासासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तसेच भूखंडाचा विकास शिघ्र गतीने होण्याच्या दृष्टीने उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये सह विकासक (Co-Developer) नेमण्यासाठी विहित केलेला कालावधी संपुष्टात आल्याने व या क्षेत्रातील उद्योजकाकडून सह-विकासक नेमण्यास परवानगी देण्यासंबधाने प्राप्त झालेली निवेदने विचारात घेता, सह-विकासक नेमण्याचा कालावधी वाढविण्याबाबतचा विषय महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ३१/१०/२०१८ रोजी झालेल्या ३७६ व्या सभेत सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ५७८७ पारीत करण्यात आला. सदर ठरावाचे अनुषंगाने विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) मधील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (IT/ITES) क्षेत्रातील उद्योजकांना भूखंड विकासासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना वाटप केलेल्या भूखंडाचा विकास शिघ्र गतीने होण्याच्या दृष्टीने सह-विकासक (Co-Developer) ची प्रकरणे गुणवत्ता निहाय तपासून

Scanned with CamScanner

महामंडळाचे उपरोक्त संदर्भिय दि.११/११/२००९ व दिनांक २७/०२/२०१३ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तीवर दिनांक ०१/०४/२०१८ पासून दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत या दोन वर्षाच्या कालावधीकरीता मा.अध्यक्ष यांचे मंजूरीने सह-विकासक (Co-Developer) नेमण्यास मान्यता देणेत येत आहे. कृपया य परिपत्रकाची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा/तं)
मऔविम, मुंबई-९३

प्रति,

१. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्याप केन्द्र (डब्ल्यु.टी.सी), कफ परेड, मुंबईसर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. सह मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम.
३. सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा/तं), मऔविम.
४. उप मुख्य कार्यकारी अधिकारी १,२,३,४ मऔविम.
५. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
६. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
७. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
८. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
९. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.
१०. महाव्यवस्थापक(भूमी)/महाव्यवस्थापक(भूसंपादन)/व्यवस्थापक(भूमी१/२)/मऔविम, मुंबई.
११. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
१२. व्यवस्थापक (भूसंपादन १/२) मऔविम, मुंबई.
१३. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
१४. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम, मुंबई.
१५. म.औ.वि.महामंडळाचे सर्व संचालक.
१६. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केन्द्र.
१७. सर्व औद्योगिक संघटना.

Scanned with CamScanner